आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१९ जून २०२४ - बुधवार

**ठळक बातम्या**

- आदिवासी समुदायाचं भारतीय अर्थव्यवस्थेत मोठं योगदान असून आदिवासी आपली ओळख आहेत, असं उपराष्ट्रपतींचं प्रतिपादन

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज बिहार मधल्या नालंदा विद्यापीठातल्या प्रदूषण विरहीत हरित आवाराचं उद्घाटन

- भारतीय रिझर्व्ह बँकेची तिसरी जागतिक हॅकेथॉन "HaRBinger 2024" मधे नोंदणीसाठी आजचा शेवटचा दिवस

- विश्व एथलेटिक्स कॉन्टिनेंटल गोल्ड टूर स्पर्धेत भारताच्या नीरज चोप्राला सुवर्ण पदक

**आणि**

- टी ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आजपासून सुपर आठ फेरीचे सामने रंगणार

**<><><><><>**

आदिवासी समुदायाचं भारतीय अर्थव्यवस्थेत मोठं योगदान असून आदिवासी आपली ओळख आहेत, असं प्रतिपादन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केलं. मध्यप्रदेशातल्या दिंडोरी इथं जागतिक सिकल सेल निर्मूलन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते आज बोलत होते. सिकलसेल आजाराचं निर्मूल करण्यासाठी सरकार कटिबद्ध असून २०४७ मध्ये भारत पूर्णपणे सिकलसेलमुक्त होईल, असा विश्वास उपराष्ट्रपतींनी यावेळी व्यक्त केला. तसंच आपल्या राज्यघटनेमध्ये आदिवासी समुदायासाठी अनेक विशेष तरतुदी असून त्याची पूर्तता करण्यात सरकारनं कोणतीही कसर ठेवली नसल्याचंही धनखड म्हणाले.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज बिहार मधल्या नालंदा विद्यापीठात प्रदूषण विरहीत हरित आवाराचं उद्घाटन केलं. ८०० वर्षांनंतर या विद्यापीठाला पुन्हा वैभव प्राप्त झाल्याचं यावेळी प्रधानमंत्री म्हणाले. ४५५ एकर विशाल भुखंडावर या नव्या परिसराची निर्मिती करण्यात आली आहे. त्यात २४ विशाल इमारती आणि ४५० विद्यार्थ्यांच्या निवासाची सोय आहे. त्या बरोबरंच अन्य अत्याधुनिक सुविधांचं निर्माणही करण्यात आलं आहे. यावेळी प्रधानमंत्र्यांनी नालंदा विद्यापिठातल्या भग्नावशेषांची पाहणी केली. तसंच परिसरात वृक्षारोपणही केलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महिला, युवक आणि गरीबांच्या कल्याणासाठी भरीव काम केल्यानं सलग तिसऱ्यांदा  शपथ घेतली, असं माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ.एल मुरुगन यांनी सांगितलं. तामिळनाडूतल्या तिरुवन्नलमलाईमध्ये ते बातमीदारांशी बोलत होते.

नरेंद्र मोदी यांनी प्रधानमंत्रीपदाची तिसऱ्यांदा शपथ घेतल्यानंतर सर्वात आधी त्यांनी शेतकऱ्यांसाठी प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधीचा सतरावा हप्ता वितरीत केल्यानं शेतकऱ्यांना मोठी आर्थिक मदत झाल्याचं मुरुगन यांनी सांगितलं. या योजनेमुळे शेतकऱ्यांना शेतीच्या कामासाठी सावकारांकडून कर्ज घेण्याची गरज राहणार नसल्याचं ही मुरुगन यांनी नमूद केलं.

**<><><><><>**

येत्या २१ जूनला साजरा होणाऱ्या आंतरराष्ट्रीय योग दिवसाचं औचित्य साधत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज समाजमाध्यमावर शशकासन करतानाचा

व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडीओमध्ये हे आसन कसे करायचे हे सांगत त्याचे फायदे सांगितले आहेत.

<><><><><>

भारतीय तटरक्षक दलानं आयोजित केलेला सागर कवच हा सागरी संरक्षण यंत्रणा सराव आजपासून दोन दिवस तमिळनाडूत होणार आहे. भारतीय नौदल, सागरी पोलीस, मासेमारी विभाग, महसूल आणि इतर सुरक्षा यंत्रणा यात सहभागी होत आहेत. देशाच्या सागरी सुरक्षेचं महत्त्व अधोरेखित करणं हा या सरावाचा उद्देश आहे.

<><><><><>

टपाल कचेरी कायदा, २०२३ कालपासून अधिकृतरीत्या अंमलात आला आहे. तो आता १८९८ च्या भारतीय टपाल कचेरी कायद्याची जागा घेणार आहे. देशाची सुरक्षा आणि सार्वजनिक सुव्यवस्था राखण्यासाठी किंवा तसं ठोस कारण असल्यास टपालामार्फत पोहोचवण्यात येणारी पार्सल वाटेतच रोखण्याचा अधिकार टपालखात्याला देण्याची तरतूद या नव्या कायद्यात करण्यात आली आहे. या कायद्यानुसार कोणत्याही आणीबाणीच्या परिस्थितीत किंवा सार्वजनिक सुरक्षेला धोका निर्माण होण्याची शक्यता असल्यास शांततेच्यादृष्टीनं त्यामध्ये हस्तक्षेप केला जाऊ शकतो. असा हस्तक्षेप केंद्र किंवा राज्य सरकार किंवा त्यांच्याद्वारे विशेष अधिकृत असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याद्वारे केला जाऊ शकतो.

<><><><><>

भारत-पाक सरहद्द क्षेत्रात प्रत्यक्ष नियंत्रण रेषेजवळ राहणा-या लदाखच्या नागरिकांच्या आरक्षणासाठी सुचना आणि हरकती मागवायला एक महिन्याची मुदतवाढ देण्यात आली आहे. हे आरक्षण ठरवण्यासाठी न्यायमूर्ती बन्सीलाल भट

यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय आयोगाची स्थापना केली आहे. विविध अर्जदारांच्या सूचना आणि हरकतींचं संकलन केल्यानंतर त्याबाबत निर्णय घेतला जाणार असल्याचं सरकारी अधिकाऱ्यांनी सांगितलं. लोकसभेच्या निवडणुकीमध्ये व्यग्र असल्यामुळे निवेदन किंवा शपथपत्रं तयार करायला विलंब झाल्याचं कारण देत आणि संबंधितां ्च्या विनंतीवरून ही मुदतवाढ देण्यात आली असल्याचंही अधिकाऱ्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँकेनं तिसरी जागतिक हॅकेथॉन "HaRBinger 2024" चं आयोजित केली असून आज याच्या नोंदणीचा शेवटचा दिवस आहे. इच्छुकांनी नोंदणी आणि त्यांचे प्रस्ताव https://app.apixplatform.com/h1/harbinger2024 या संकेतस्थळावर नोंदवावेत असं आवाहन आरबीआयनं केलं आहे.

अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत आर्थिक फसवणूक टाळण्याचे विविध उपाय, टोकनवर आधारित व्यवहारात सुलभीकरण आणत ते अधिक सुरक्षित करणं, कोणतेही व्यवहार होत नसलेली बँक खाती ओळखणं आणि खराब झालेल्या नोटा अचूकपणं ओळखणं अशा विविध गोष्टींसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून तयार केलेल्या प्रस्तावांना आरबीआयनं आयोजित केलेल्या HaRBinger 2024 या हॅकेथॉनमध्ये निमंत्रित केलं आहे. आज या हॅकेथॉन नोंदणीचा शेवटचा दिवस असून यात १८ वर्षे आणि त्यावरील व्यक्ती अथवा समूह सहभागी होऊ शकतात.

**<><><><><>**

मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव अर्थात मिफचा आज पाचवा दिवस आहे. मिफमध्ये आज राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धेतले माहितीपट, तसंच शॉर्ट फिक्शन, बेलारूस, रशिया आणि फ्रान्स या देशांचे, तसंच ऑस्करसाठी निवडले गेलेले चित्रपट दाखवण्यात येणार आहेत. आशियाई महिलांचे विशेष चित्रपट, दिव्यांगजनांसाठी तयार केलेले विशेष चित्रपटही पाहता येणार आहेत. याशिवाय लघुपट, ॲनिमेशन, माहितीपट, वेबसीरीज आणि ओटीटी मंच या विषयांवरची चर्चासत्रं, परिसंवाद आणि मार्गदर्शन सत्रंही होणार आहेत. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धेचे परीक्षक आज वार्ताहरांशी संवाद साधतील.

**<><><><>**

आयसीसी टी ट्वेंटी  विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आजपासून सुपर आठ संघांमधले सामने सुरू होणार आहेत. हे सर्व सामने वेस्ट इंडिज मध्ये खेळले जाणार आहे. यातला पहिला सामना आज अमेरिका आणि दक्षिण आफ्रिकेच्या संघांदरम्यान खेळला जाणार आहे. सुपर आठ फेरीतला भारताचा पहिला सामना उद्या अफगाणिस्तान बरोबर होणार आहे. बांगलादेशने सर्वात शेवटी नेपाळवर विजय मिळवून सुपर आठ मधे प्रवेश केला आहे.

**<><><><>**

अमेरिकन व्यक्तीशी विवाह केलेल्या परंतु कायदेशीररित्या देशात राहण्याचा अधिकार नसलेल्या अनेक स्थलांतरितांना नागरिकत्व देण्यासंदर्भात एक नवीन तरतूद अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडेन यांनी केली आहे. या तरतुदीमुळे सुमारे पाच लाख नागरिकांना मायदेशी परत पाठवलं जाणार नाही. बायडेन यांनी मांडलेल्या प्रस्तावात अमेरिकेत किमान दहा वर्षे वास्तव्य केलेल्या आणि अमेरिकन

व्यक्तीशी लग्न करुन अपत्यांना जन्म देणाऱ्या व्यक्तीला कायमस्वरुपी नागरिकत्व देण्याची शिफारस केली आहे.

बायडेन यांचा हा प्रस्ताव त्यांचे कट्टर प्रतिस्पर्धी मानले जाणारे रिपब्लिकन पक्षाचे डोनाल्ड ट्रम्प यांनी मांडलेल्या प्रस्तावाच्या अगदी विरुद्ध आहे. ट्रम्प यांनी अशा नागरिकांना परत मायदेशी पाठवण्यावर भर दिला होता.

**<><><><><>**

एकदिवसीय महिला क्रिकेटच्या तीन सामन्यांच्या मालिकेतला दुसरा सामना आज भारत आणि दक्षिण आफ्रिकेदरम्यान बंगळुरु इथं सुरू आहे. दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक जिंकली असून पहिल्यांदा क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे.

या मालिकेत भारत एक - शून्यनं आघाडीवर आहे. या मालिकेनंतर दोन्ही संघात एक कसोटी सामना आणि तीन टी - ट्वेंटी क्रिकेट सामन्यांची मालिका होणार आहे.

**<><><><><>**

भारताचा ऑलिम्पिक आणि विश्वविजेता भालाफेकपटू नीरज चोप्रा याने फीनलंड इथ सुरू असलेल्या विश्व एथलेटिक्स कॉन्टिनेंटल गोल्ड टूर स्पर्धेत काल सुवर्ण पदक पटकावलं. काल रात्री उशिरा झालेल्या सामन्यात नीरजनं तिसऱ्या प्रयत्नात ८५ पूर्णांक ९७ शतांश मीटर अंतरा वर भालाफेक करून हे यश मिळवलं. तत्पूर्वी त्याने पहिल्या प्रयत्नांत ८३ पूर्णांक ६२ शतांश मीटर अंतरावर भाला फेक करून आपल्या खेळाची सुरुवात केली होती.

**<><><><><>**

महाराष्ट्र, छत्तीसगड, ओदिशा, आंध्रप्रदेशचा किनारी भाग, बंगालचा गंगा किनाऱ्यावरचा भाग, तसंच बिहार आणि झारखंडमध्ये मान्सूनच्या वाटचालीसाठी

वातावरण अनुकूल असल्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. तसंच उत्तर भारताला उष्णतेपासून दिलासा मिळेल असं हवामान विभागाने कळवलं आहे.

**<><><><><>**

काँग्रेसच्या हरियाणाल्या नेत्या किरण चौधरी आणि त्यांची कन्या श्रुती चौधरी यांनी आज नवी दिल्लीत भाजपमध्ये प्रवेश केला. हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सिंग सैनी, खासदार मनोहर लाल खट्टर  आदी ज्येष्ठ नेते यावेळी उपस्थित होते.

//<><><><><>//